# भुयारी मेट्रोची २०२१ मध्ये ट्रायल

## मुंबईकरांना बीकेसी ते सीप्झ पहिल्या टप्प्याची सफर

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) – कुलाबा ते सीप्झ अशा ३३.५ कि.मी.च्या संपूर्ण जमिनीखालून जाणाऱ्या भुयारी मेट्रो मार्गाचा वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स ते सीप्झ हा पहिला टप्पा सन २०२१ रोजी पूर्ण होणार असल्याने रेल्वे मार्गाने आतापर्यंत कधीही न जोडल्या न गेलेल्या मुंबईची थंडाथंडा कुल सफर मुंबईकरांना घडणार आहे.

मुंबईत मेट्रोची जागोजागी कामे सुरू असल्याने मुंबईकरांची सध्या जागोजागी कोंडी होत आहे. पश्चिम द्रुतगती महामार्गावर अभूतपूर्व कोंडी होत असल्याने सकाळी दक्षिण मुंबईत नोकरीसाठी येणाऱ्यांना पश्चिम रेल्वेच्या ओव्हरपॅक गाड्यांवर विसंबून राहावे लागत आहे. त्यासाठी रेल्वेने न जोडलेला कफ परेड, वरळी, धारावी, बीकेसी, आग्रीपाडा, विमानतळ अशा दाट वस्तीच्या भागातून जमिनीखालून भुयारी मेट्रोचे काम सुरू आहे. त्यासाठी कामाचे सात पॅकेजमध्ये वाटप करण्यात आले असून बोगद्यांचे काम करणाऱ्या 'टीबीएम' म्हणजे टनेल बोअरिंग मशीन बेसाल्टचा प्रस्तर कापत मार्ग तयार करतच हळूहळू पुढे पुढे सरकत आहेत.

*भुयारी मेट्रो-३ करिता भागभांडवल उभारताना जपानच्या 'जायका'चे ४५ टक्के, २५ टक्के केंद्र सरकार आणि २५ टक्के राज्य सरकारने उभारायचे ठरले असून केवळ पाच टक्के रक्कम एमएमआरडीएला उभारावी लागणार आहे. म्हणजे साधारण ३० हजार कोटींच्या या प्रकल्पासाठी १५०० कोटी उभारण्यात काही अडचण येणार नाही, परंतु खरी कसोटी इतर एलिवेटेड मार्गांसाठी पैसा उभारताना लागणार असल्याचे वाहतूकतज्ज्ञ सुधीर बदामी यांनी दै. 'सामना'शी बोलताना सांगितले.*

### ३० मार्चपर्यंत २३.६९ कि.मी.चे काम पूर्ण

*सात पॅकेजमध्ये १७ टीबीएम मशीन कार्यरत असून काम वेगाने सुरू आहे. मेट्रो-३ चा कुलाबा-बीकेसी ते सीप्झ असा एकूण ३३.५ कि.मी. मार्ग असला तरी एकूण ५२.२१ कि.मी.चे खोदकाम करावयाचे आहे. ३० मार्चपर्यंत २३.६९ कि.मी.चे बोगदे तयार करण्याचे काम पूर्ण झाल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले. त्यामुळे बीकेसी ते सीप्झ (अंधेरी) अशा दुसऱ्या टप्प्याची मेट्रोची ट्रायल सन २०२१ रोजी होणार असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) ट्विटरवर म्हटले आहे.*

